ma yojana.in

महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

जा. क्र. NDKSP-१६०२४(११)/२/२०२५-१६/E- २३४२०२४/कृ. अ. दि. २७/११/२०२६

प्रति

१. विभागीय कृषी सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)
२. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय - नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांपैकी नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणसहित) या घटकाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबत.

संदर्भ - १. शासन निर्णय क्र. नादेकृ ४६२२/प्र.क्र. ९४/८-अे, दिनांक १४.१०.२०२४.
२. शासन निर्णय क्र. कृपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-८A (E-११६८०५०), दि:- ०८.०७.२०२५.

उपरोक्त विषयान्वये, महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत जागतिक बँकेच्या आर्थिक सहाय्याने राबविण्यात येणाऱ्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी संदर्भ क्र. १ नुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावांची निवड करण्यात असून त्यानुसार सदर गावांमध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू आहे.

हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या अनियमित पर्जन्यमानाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना पिकांच्या गरजेनुसार संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तथापि, भूजल स्रोतांवर वाढता ताण लक्षात घेता नवीन सिंचन विहिरींची निर्मिती करताना भूजल उपलब्धता, पुनर्भरण क्षमता आणि भूजल स्रोतांची शाश्वतता यांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. या अनुषंगाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या घटकांमध्ये 'नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह)' या घटकाचा समावेश करण्यात आला आहे.

नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह) हा घटक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या (GSDA) निकषांनुसार प्रकल्पांतर्गत भूजलाच्या दृष्टीने सुरक्षित क्षेत्र (Safe Zone) म्हणून वर्गीकृत असलेल्या गावांमध्ये गावनिहाय लक्षांकाधारीत पद्धतीने राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने, 'नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह)' या घटकाच्या प्रभावी, पारदर्शक व नियोजनबद्ध अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रित करण्यात येत आहेत.

सदर घटकाची माहिती व मार्गदर्शक सुचने नुसार निवड प्रक्रिया प्रकल्पांतर्गत पात्र गावांमधील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक प्रचार व प्रसिद्धी तसेच जनजागृती करण्यात यावी. सदर घटकासाठी अर्ज प्रक्रिया सुरू होण्याचा दिनांक, लाभार्थी निवड प्रक्रिया तसेच पुढील कार्यवाहीबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. सोबत सहपत्रित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना नुसार सदर घटकाची प्रकल्पांतर्गत गावांमध्ये अंमलबजावणी करण्यात यावी.

(मिनल करनवाल)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

प्रत:-
१. मा. सचिव (कृषि), कृषि विभाग, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

mahasarkariyojana.in

मार्गदर्शक सूचना
नवीन सिंचन विहिर (पुनर्भरणासह)

१.	**प्रस्तावना**	
		हवामान बदलाचा राज्यातील शेतीवर विपरीत परिणाम होत असून, भविष्यात या परिणामांची तीव्रता व व्याप्ती वाढण्याची शक्यता राज्याच्या हवामान बदलविषयक कृती आराखड्यामध्ये नमूद करण्यात आली आहे. विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना गेल्या काही वर्षांपासून वारंवार दुष्काळ व अनियमित पावसाच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यामुळे भूजल पातळीत घट, जमिनीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम तसेच पिकांच्या उत्पादकतेत घट होत असल्याचे दिसून येते. या परिस्थितीचा सर्वाधिक परिणाम अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांवर होत असून, त्यांच्या शेती उत्पादनावर व उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होत आहे. हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीशी शेतकऱ्यांना जुळवून घेण्यास सक्षम करणे, शेतीची उत्पादकता वाढवण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनामार्फत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा २ राबविण्यात येत आहे. राज्यातील बहुतांश शेती पावसावर आधारित कोरडवाहू स्वरूपाची असल्यामुळे पिकांच्या गरजेनुसार वेळेवर पाणी उपलब्ध करून देणे हे शेतकऱ्यांसमोरील महत्त्वाचे आव्हान आहे. पावसातील अनियमितता व पावसाच्या खंडामुळे पिकांना पाण्याचा ताण सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. विहीर हा संरक्षित सिंचनाचा एक महत्त्वपूर्ण स्रोत असून, उपलब्ध भूजलाचा शाश्वत व नियोजनबद्ध वापर केल्यास पिकांना गरजेच्या वेळी पाणी उपलब्ध करून देणे शक्य होते. सध्याच्या टंचाईग्रस्त व हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता लक्षात घेता, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा २ अंतर्गत वैयक्तिक लाभासाठी "नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह)" हा घटक समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची सिंचनक्षमता वाढण्यास, पावसावर असलेले अवलंबित्व कमी होण्यास आणि प्रतिकूल परिस्थितीत पिकांचे संरक्षण करण्यास मदत होईल.
२.	**उद्देश :**	
	२.१	नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये समाविष्ट गावातील शेतक-यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
	२.२	संरक्षित सिंचनाची सोय निर्माण करणे व पिक उत्पादन वाढवण्यास चालना देणे .
	२.३	भूजल पातळी टिकवून पर्यावरणीय शाश्वततेला प्रोत्साहन देणे.
३.	**लाभार्थी निवडीचे निकष:**	
	३.१	भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (GSDA) यांच्या निकषांनुसार प्रकल्पांतर्गत गावांपैकी सुरक्षित क्षेत्रात (Safe Zone) येणाऱ्या गावांमध्ये सदर घटक राबविण्यात येईल.
	३.२	अंशत: शोषित/ शोषित/ अतिशोषित (सेमीक्रिटीकल/क्रिटीकल/ओव्हर एक्सप्लॉयटेड) गावामध्ये नवीन सिंचन विहीर घेण्यात येवू नये.
	३.३	नवीन सिंचन विहीर घेण्यासाठी अर्जदार शेतकऱ्याकडे एकूण जमिनीचे क्षेत्र किमान ०.४० हेक्टर व कमाल ५.० हेक्टर असणे आवश्यक आहे.
	३.४	सदर घटकाचा लाभ हा कुटुंबातील (पती-पत्नी व अविवाहित मुले) केवळ एकाच खातेदार व्यक्तीला घेता येईल.
	३.४	संरक्षित सिंचनाची सोय (शेततळे, बोअरवेल, विहीर, बोडी इत्यादि.) उपलब्ध असलेला अर्जदार नवीन सिंचन विहीर घटकास पात्र राहणार नाही.
	३.५	लाभार्थ्याच्या ७/१२ वर तसेच शेतात प्रत्यक्ष विहीर असल्यास या घटकाचा लाभ घेता येणार नाही.
	३.६	नवीन सिंचन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने यापूर्वी केंद्र / राज्य / जिल्हा परिषद अथवा इतर कोणत्याही शासकीय योजनेतून नवीन सिंचन विहीरीचा लाभ घेतलेला नसावा.

mahasarkariyojana.in

	३.७	यापुर्वी शासकीय योजनेतून घेतलेल्या व अर्धवट राहीलेल्या अपुर्ण विहीरीचे काम करण्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
	३.८	केंद्र / राज्य / जिल्हा परिषद अथवा इतर कोणत्याही शासकीय योजनेमधून विहीर घटकासाठी निवड झालेली असल्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
	३.९	लाभार्थी निवड संगणकीय प्रणालीद्वारे लॉटरी पद्धतीने (Lottery-Based Selection) करण्यात येईल. प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र अर्जदारांची यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर लाभार्थ्यांच्या निवडीसाठी संगणकीय प्रणालीद्वारे लॉटरी प्रक्रिया राबविण्यात येईल. प्रत्येक गावातून ३ लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.
	३.१०	निवड झालेल्या लाभार्थ्यांसाठी, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले पाणी उपलब्धततेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.
४.	**पुनर्भरणासह नवीन सिंचन विहीरीसाठी जागा ठरविण्याची मार्गदर्शक तत्वे -**	
	४.१	**नविन विहिरीसाठी योग्य जागा**
		४.१.१. दोन नाल्याच्या जोडामधील जागा, ज्या ठिकाणी मातीचा थर किमान ३० सेमी व कच्च्या खडकाची/मुरुमाची जाडी ही किमान ५ मीटर आहे.
		४.१.२. नदीच्या किंवा नाल्याच्या लगतचा उथळ गाळाच्या प्रदेशात (रेती , ग्रॅव्हल ई. मिश्रीत)
		४.१.३. भौगोलिक दृष्ट्या सखल भाग ज्या ठिकाणी जेथे किमान ३० सेमी पर्यंत मातीचा थर व किमान ५ मीटर खोली पर्यंत मुरूम (झिजलेला खडक) आढळतो.
		४.१.४. नाल्याच्या तिरावरील उंचवट्याच्या ठिकाणी जागेची निवड करावी; मात्र सदर ठिकाणी चोपण किंवा चिकणमातीचा थर नसावा.
		४.१.५. घनदाट व गर्द पानाच्या झाडांच्या प्रदेशात.
		४.१.६. वाळू, रेती व गारगोट्यांचा थर (Boulders & Gravels) व्यापलेल्या जुन्या नदीच्या प्रवाहाच्या पट्ट्यात (Old River Course) घेण्यात यावे.
		४.१.७. नदी / नाल्याच्या तीव्र (Sharp) वळणाच्या ठिकाणी आतील भागात घेण्यात यावे.
		४.१.८. अचानक दमट वाटणाऱ्या अथवा ओलावा असणाऱ्या जागेत घेण्यात यावे.
	४.२	**नवीन सिंचन विहीरीसाठी अयोग्य जागा**
		४.२.१. भूपृष्ठावर कडक खडक दिसणा-या जागेत.
		४.२.२. डोंगराचा कडा व आसपासचे १५० मीटरचे अंतरात.
		४.२.३. मातीचा थर ३० से.मी. पेक्षा कमी असणा-या भूभागात.
		४.२.४. खारवट जमिनीचा भाग व खारपाण पट्टा.
		४.२.५. मुरमाची (झिजलेला खडक) खोली ५ मीटर पेक्षा कमी असणा-या भूभागात. (मुरमाची खोली सर्वसाधारणपणे अस्तित्वात असलेल्या जवळपासच्या विहिरीत डोकावले असता समजते आसपास विहीर नसल्यास जवळच्या नदी/नाल्याच्या काठावरुन मुरमाची खोलीचा अंदाज मिळू शकतो).
		४.२.६. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ नुसार सार्वजनीक पिण्याच्या पाण्याच्या उदभवापासून ५०० मी. च्या अंतरात नवीन सिंचन विहीर घेता येणार नाही.
५.	**अर्थसहाय्य:**	
	अनुज्ञेय अनुदानाचा तपशील खालीलप्रमाणे आहे -	

अ.क्र.	घटक	अधिकतम अनुज्ञेय अनुदान (रु.)	
		ज. जा. उ. यो. /डोंग. भाग	इतर

mahasarkariyojana.in

	अ.	नविन विहीर	**४,००,०००**	
	ब.	विहीर पुनर्भरण अनुदान*		
		१. भारी जमीन	**२१०२३**	**१९,४९२**
		२. हलकी जमीन	**२१८६७**	**२०,२२५**

***विहीर पुनर्भरण ह्या घटकासाठी प्रकल्पाच्या संकेतस्थळावरील स्वतंत्र मार्गदर्शक सूचना पाहाव्या.**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासहित) या घटकासाठी अनुदानाचे वितरण दोन टप्प्यांत होईल.

टप्पा १ :अंदाज पत्रकानुसार विहिरीचे खोदकाम पूर्ण झाल्यानंतर.

टप्पा २: बांधकाम व पुनर्भरण काम पूर्ण झाल्यानंतर.

संदर्भ :

१. शासन निर्णय क्र२०२२ नोव्हेंबर ४ - दिनांक ,१-मग्रारो / १८२ .क्र.प्र / २०२१-मग्रारो .

२. डॉ२०२५ बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना .-२६ च्या मार्गदर्शक सूचना. जा .डॉ/ ७.विप्र .क्र. २०२/ मासू/ .यो.स्वा.कृ.आं.बा५२-६ २६ दिनांक ,२०२५/ ९०१-र / /०५२०२५/

३. बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना २०२५च्या मार्गदर्शक सूचना २६-. जा मासू/ बिमुकृक्रायो / ७.विप्र.क्र. २६ दिनांक ,२०२५/ ९००-र / २६-२०२५//०५२०२५/

४. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र२०२४.०५.१४ .डी ,२०२४/१३१७२/मजुरी दर/६-मृद/मृदसं.क्र.जा .

प्रकल्पांतर्गत नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह) हा घटक राबविताना, प्रस्तुत मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद नसलेल्या बाबींसाठी संदर्भित मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदी लागू राहतील.

६. **अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या**

६.१ लाभार्थी

६.१.१. इच्छुक शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/IndividualFarmer/Login या संकेतस्थळ अथवा महाविस्तार एआय ह्या ॲपवरून अर्ज सादर करावा. तसेच आवश्यक कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावीत.

६.१.२. शेतकऱ्यांनी अर्ज सादर करते वेळी परीशिष्ट-२ प्रमाणे विहित प्रपत्रातील हमीपत्र अपलोड करणे बंधनकारक राहील.

६.१.३. पुर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर एक वर्षात काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. विहित कालावधीत काम पूर्ण न झाल्यास पूर्वसंमती रद्द करण्यात येईल. पूर्वसंमती रद्द झाल्यानंतर प्रतिक्षा यादीतील पुढील अर्जदारास सदर योजनेचा लाभ देण्यात येईल.

६.१.४. पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचना, तांत्रिक निकषाप्रमाणे काम पूर्ण करणे बंधनकारक राहील.

६.१.५. लाभार्थ्याला सदर कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही.

६.१.६. लाभार्थींनी विहीर खोदकामाच्या निकषाबाबत सहाय्यक कृषि अधिकारी/उप कृषि अधिकारी यांचेकडून मार्गदर्शन/ सूचना घेऊन सदर काम करावयाचे आहे.

६.१.७. लाभार्थ्याला विहीर पुनर्भरण या घटकाचे काम पूर्ण करणे बंधनकारक राहील.

६.१.८. लाभार्थ्यांने विहीरीचे खोदकाम पूर्ण झाल्यावर पहिल्या टप्प्यातील अनुदान मागणी प्रपत्र (परीशिष्ट-४ अ) प्रकल्पाच्या पोर्टल वर अपलोड करावी.

६.१.९. लाभार्थ्यांने विहीर बांधकाम आणि विहीर पुनर्भरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील अनुदान मागणी प्रपत्र (परीशिष्ट-४ ब), देयके, **नवीन झालेल्या विहीरीची नोंद घेतलेला ७/१२** व इतर आवश्यक कागदपत्रे स्वसाक्षांकित करून प्रकल्पाच्या डीबीटी पोर्टलवर अपलोड करावीत.

६.१.१०. काम पूर्ण झालेल्या विहिरीची नोंद ७/१२ उता-यावर घेण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील.

६.१.११. विहीर पुनर्भरणाचे काम पूर्ण झाल्यानंतरच अंतिम अनुदान मागणी करण्यात यावी.

mahasarkariyojana.in

		६.१.१२. प्रकल्प स्थळी ४ X ३ फूट आकाराचा फलक लावून त्यावर "नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या अर्थसहाय्याने "असे नमूद करुन शेतकऱ्याचे नाव, गाव, सर्वे नं., वर्ष, एकुण खर्च रक्कम, अर्थसहाय्याची रक्कम इत्यादी तपशील नमूद करावा. ६.१.१३. लाभार्थ्याने विहिरीसाठी योग्य जागा निश्चित करण्यासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत शेताचे सर्वेक्षण करून घेण्याची शिफारस करण्यात येत आहे. ६.१.१४. लाभार्थ्याने उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याच्या दृष्टीने सूक्ष्मसिंचन पद्धतींचा अवलंब करण्यास प्राधान्य द्यावे.
	६.२	**समुह सहायक**
		६.२.१. समुह सहायक हे इच्छूक लाभार्थी शेतकऱ्यांचे प्रकल्पाच्या https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/individualfarmer/login या संकेतस्थळावर अथवा महाविस्तार एआय ह्या ॲपवरून अर्ज करून घेतील. ६.२.२. शेतकऱ्यांस योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाबाबतचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगतील. ६.२.३. शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केल्यानंतर शेतकऱ्याने अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी करतील. ६.२.४. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि विकास समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झालेनंतर तसा ठराव संकेतस्थळावर अपलोड करणे.

	६.३	**ग्राम कृषि विकास समिती)GKVS)**
		६.३.१. गावातील इच्छुक शेतकऱ्यांना या घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठीचे अर्ज करणे, यासाठी जनजागृती करतील. ६.३.२. इच्छुक लाभार्थी यांचे प्राप्त अर्जांच्या पात्र/अपात्रते बाबत निर्णय घेऊन अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणांसह अवगत करतील. ६.३.३. अंमलबजावणी करण्यात आलेल्या बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करणे.
	६.४	**सहाय्यक कृषि अधिकारी**
		६.४.१ सदर घटकाबाबत गावामध्ये व्यापक प्रचार प्रसिद्धी करणे, घटकाचे तांत्रिक निकषाबाबत गावामध्ये व ग्राम कृषि विकास समिती मध्ये जन जागृती करणे. ६.४.२ निवड झालेल्या अर्जदाराने ऑनलाईन अपलोड केलेल्या कागदपत्रांची छानणी करणे. ६.४.३ छाननी करताना शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज, ग्राम कृषि विकास समिती सभेचे इतिवृत्त, इत्यादी बाबींची छाननी करणे. ६.४.४ लाभार्थी शेतक-र्याने अर्जामध्ये यापूर्वी इतर योजनेतून लाभ घेतलेला आहे काय? याची पडताळणी करून पूर्वसंमतीस शिफारस करणे. ६.४.५ लॉटरी प्रक्रियेद्वारे निवड झालेल्या अर्जदाराच्या नवीन विहीरीसाठी प्रस्तावित स्थळाची प्रत्यक्ष पाहणी करून जागा तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय याची पडताळणी करावी आणि आवश्यक माहिती डीबीटी ॲपमध्ये नोंदवावी. ६.४.६ जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या व प्रकल्पाच्या पोर्टल वर उपलब्ध असलेल्या पाणी उपलब्धता प्रमाणपत्राच्या यादी मध्ये निवड झालेल्या लाभार्थ्याच्या नावाची पडताळणी करावी. ६.४.७ प्रत्यक्ष स्थळ पाहणी नुसार अंदाजपत्रक तयार करून डेस्क २ वरुन अपलोड करावे. ६.४.८ लाभार्थ्यास पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर खोदकामासाठी प्रत्यक्ष स्थळावर आखणी करून देणे व मार्गदर्शन करणे. ६.४.९ काम सुरू असताना विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे व तांत्रिक निकषाप्रमाणे काम होत असल्याची खात्री करणे.

mahasarkariyojana.in

		६.४.१० तालुका कृषि अधिकारी यांना मोका तपासणी व मापन पुस्तिका तयार करणे साठी सहाय्य करणे.
	६.५	**उपकृषी अधिकारी**
		६.५.१ काम सुरू असताना विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे व तांत्रिक निकषाप्रमाणे काम होत असल्याची खात्री करणे. ६.५.२ कार्यक्षेत्रामध्ये सदर घटकांच्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी आढावा घेणे.
	६.६	**मंडळ कृषि अधिकारी**
		६.६.१. काम सुरू असताना विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे व तांत्रिक निकषाप्रमाणे काम होत असल्याची खात्री करणे. ६.६.२. कार्यक्षेत्रामध्ये सदर घटकांच्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी आढावा घेणे.
	६.७	**तालुका कृषि अधिकारी**
		६.७.१. निवड झालेल्या लाभार्थ्याने ऑनलाईन प्रणालीवरून अनुदान मागणी केल्यावर मोका तपासणी करावी. ६.७.२. काम पूर्ण झालेल्या स्थळाला प्रत्यक्ष भेट देऊन काम तांत्रिकदृष्ट्या व मार्गदर्शक सूचनांनुसार पूर्ण झाले आहे याची खातरजमा करून देय अनुदानाची परिगणना करावी. ६.७.३. अनुदान वितरणासाठी आवश्यक असलेली देयके व इतर कागदपत्रे तपासून प्रमाणित करावीत व मापनपुस्तिकेत नोंदी घेऊन प्रकल्पाच्या DBT ॲपमध्ये/प्रणालीवर अपलोड करावीत. ६.७.४. पुनर्भरणासहित विहीरीचे काम पूर्ण झाल्याचा मोका तपासणी अहवाल (परिशिष्ट ५ अ व परिशिष्ट ५ ब), इतर आवश्यक माहिती व फोटो DBT ॲपमध्ये अपलोड करावेत. ६.७.५. अंदाजपत्रकानुसार खोदकाम करताना शेतपरिस्थिती व भूपृष्ठाच्या रचनेमुळे अडचणी निर्माण झाल्यास, तालुका कृषी अधिकारी यांनी स्वतः स्थळाची तपासणी करून शेतकऱ्यास मार्गदर्शन करावे. ६.७.६. विहिरीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्याने सदर विहिरीची नोंद ७/१२ उताऱ्यावर करून घेतली आहे आणि विहीर पुनर्भरणाचे काम पूर्ण केले आहे याची खातरजमा करणे. वरील सर्व बाबींची पूर्तता झाल्याची खात्री करूनच अंतिम अनुदान अदायगीसाठी शिफारस करण्यात यावी. ६.७.७. काम सुरू असताना विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे व तांत्रिक निकषाप्रमाणे काम होत असल्याची खात्री करणे. ६.७.८. कार्यक्षेत्रामध्ये सदर घटकांच्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी आढावा घेणे.
	६.८.	**लेखाधिकारी उपविभाग स्तर :**
		६.८.१ तालुका कृषि अधिकारी यांनी शिफारस केलेल्या प्रस्तावाची लेखा अधिकारी उपविभाग स्तर हे मुख्यतः खालील बाबींची छानणी करतील. शेतक-याने अपलोड केलेले देयक, शेतक-याचे हमीपत्र, इत्यादी तसेच तालुका कृषि अधिकारी स्तरावरून अपलोड केलेले मोका तपासणी अहवाल, मापन पुस्तिका, प्रकल्प स्थळाचे शेतकरी/ शेतकरी प्रतिनिधी समवेत फोटो, साक्षांकित देयके, व इतर कागदपत्रे. ६.८.२ तालुका कृषि अधिकारी यांनी शिफारस केलेली रक्कम मार्गदर्शक सुचनेनुसार असल्याचे याची खातरजमा करतील. ६.८.३ अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी. ६.८.४ प्रस्तावाच्या छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास शेरा नमूद करून संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांचे कडे त्रुटी पूर्ततेसाठी परत (Back To Stage) पाठवतील.
	६.९.	**उपविभागीय कृषि अधिकारी**
	६.९.१.	**पूर्वसंमती**
		६.९.१.२. सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याकडून पूर्वसंमतीसाठी शिफारस करण्यात आलेल्या

mahasarkariyojana.in

		प्रस्तावांमधील कागदपत्रांची व अर्जाची छाननी करावी. ६.९.१.३. लाभार्थी शेतकऱ्याने विहीर या घटकाचा यापूर्वी इतर कोणत्याही शासकीय योजनेतून लाभ घेतला आहे किंवा नाही, याची पडताळणी करावी. ६.९.१.४. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या व प्रकल्पाच्या पोर्टल वर उपलब्ध असलेल्या पाणी उपलब्धता प्रमाणपत्राच्या यादी मध्ये निवड झालेल्या लाभार्थ्याच्या नावाची पडताळणी करावी. ६.९.१.५. केंद्र / राज्य / जिल्हा परिषद अथवा इतर कोणत्याही शासकीय योजनेमधून विहीर घटकासाठी निवड झालेली आहे काय याची खात्री करावी. ६.९.१.६. सहाय्यक कृषी अधिकारी यांनी सादर केलेला स्थळनिश्चिती अहवाल व त्याअनुषंगाने अपलोड केलेले सविस्तर अंदाजपत्रक यांची तपासणी करावी. ६.९.१.७. संबंधित लाभार्थी पूर्वसंमतीसाठी पात्र असल्याची उपविभागीय कृषि अधिकारी खात्री पटल्यानंतर, त्यांना विहीर खोदण्यासाठी ऑनलाइन पूर्वसंमती प्रदान करावी. ६.९.१.८. लाभार्थ्यास नवीन सिंचन विहीर घटकासाठी प्रदान करण्यात आलेली पूर्वसंमती हीच संबंधित विहीरीसाठी दिलेली **तांत्रिक मान्यता समजण्यात यावी**. ६.९.१.९. ज्या शेतकऱ्यांच्या अर्जामध्ये किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी असतील, अशा प्रकरणांमध्ये त्रुटींचा स्पष्ट उल्लेख करून प्रस्ताव आवश्यक पूर्ततेसाठी सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याकडे पुन्हा (Back to Stage) करावे. आवश्यक पूर्तता झाल्याशिवाय पूर्वसंमती प्रदान करू नये. ६.९.१.१०. मार्गदर्शक सूचनांनुसार लाभार्थी पात्र ठरत नसल्यास उपविभागीय कृषी अधिकारी यांनी संबंधित अर्ज योग्य कारण नमूद करून नामंजूर (Reject) करावा. ६.९.१.११. काम सुरू असताना विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे व तांत्रिक निकषाप्रमाणे काम होत असल्याची खात्री करणे. ६.९.१.१२. कार्यक्षेत्रामध्ये सदर घटकांच्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी आढावा घेणे.
	६.९.२.	**अनुदान मंजूरी**
		६.९.२.१. लेखाधिकारी स्तरावरून शिफारस केलेले प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावांची छाननी करावी व लेखाधिकारी यांनी शिफारस केलेल्या अनुदानाच्या रकमेस अंतिम मान्यता प्रदान करावी. ६.९.२.२. प्रस्तावांच्या छाननीदरम्यान त्रुटी आढळून आल्यास, संबंधित त्रुटींचा स्पष्ट शेरा नमूद करून सदर प्रकरण त्रुटींच्या पूर्ततेसाठी मागील डेस्ककडे (Back to Stage) परत पाठवावे. ६.९.२.३. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.
	६.१०	**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :**
		६.१०.१ ग्राम कृषी विकास समितीमार्फत ऑनलाईन पद्धतीने पात्र लाभार्थ्यांची यादी प्राप्त झाल्यानंतर, प्रकल्पाच्या DBT पोर्टलवर जिल्हास्तरीय नोडल अधिकारी यांचे मार्फत संगणकीय प्रणालीद्वारे लाभार्थी निवडीची प्रक्रिया (Lottery based selection) राबविण्यात यावी. ६.१०.२. संगणकीय पद्धतीने निवड झालेल्या लाभार्थ्याचे पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र भूजल विकास व सर्वेक्षण यंत्रणा यांचेकडून प्राप्त करून घेणे व संबंधित सहाय्यक कृषि अधिकारी/तालुका कृषी अधिकारी/उपविभागिय कृषी अधिकारी यांना ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांची राहील. ६.१०.३. जिल्ह्यामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी. ६.१०.४. नेमून दिल्या प्रमाणे कामांची आकस्मिक तपासणी करावी व विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल (परिशिष्ट-६) सादर करावा.

mahasarkariyojana.in

	६.११.	**विभागीय कृषि सहसंचालक:**
		६.११.१. विभागामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे. ६.११.२. विभागस्तरावर राबविलेल्या नवीन सिंचन विहीर गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे. ६.११.३. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे .(परिशिष्ट-६)
७.	**क्षेत्रीय तपासणी:**	
	या घटकाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सनियंत्रण अधिकाऱ्यांनी सोबतच्या विहीत परिशिष्ट- ६ मधिल नमुन्यात तपासणी करावी व तपासणी अहवाल सादर करावा.	

सनियंत्रण अधिकारी	**तपासणी संख्या**
विभागीय कृषि सहसंचालक	प्रति जिल्हा १
नोडल अधिकारी, वि.कृ.स.सं. कार्यालय	प्रति जिल्हा २
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी	प्रति तालुका १
नोडल अधिकारी, जि.अ.कृ.अ. कार्यालय	प्रति तालुका २
उपविभागीय कृषि अधिकारी	प्रति तालुका २

तपासणी करीता प्रकरणांची निवड यादृच्छिक पद्धतीने करावी, तसेच प्रकरणे निवडताना वरिष्ठ अथवा यांनी इतर अधिकारी यांनी तपासणी केलेली प्रकरणे वगळण्यात यावी.

mahasarkariyojana.in

परिशिष्ट -१
अर्ज प्रक्रियेचे विविध स्तर

अनु क्र.	कार्यवाही प्रक्रिया	स्तर	कालमर्यादा
१.	लाभार्थी शेतकऱ्याने कागदपत्रे अपलोड करणे	लाभार्थी	-
२.	लाभार्थी शेतकाऱ्याने अपलोड केलेली कागदपत्रे व माहिती यांची पडताळणी करणे	समूह सहायक	१० दिवस
३.	ग्राम कृषि विकास समितीची मान्यता घेणे व पात्र लाभार्थ्याची यादी अंतिम करणे.	समूह सहायक व ग्राम कृषि विकास समिती	१० दिवस
४.	लाभार्थी निवडीसाठी संगणकीय प्रणालीद्वारे लॉटरी प्रक्रिया राबवणे.	नोडल अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय	-
५.	लाभार्थी शेतकाऱ्याने अपलोड केलेली कागदपत्रे व माहिती तसच ग्राम कृषि विकास समितीची मान्यता यांची पडताळणी करणे व स्थळपाहणी करणे.	सहाय्यक कृषि अधिकारी	१० दिवस
६.	पूर्वसंमती देणे	उप विभागीय कृषि अधिकारी	१० दिवस
७.	अनुदान मागणी करणे	लाभार्थी शेतकारी	३६५ दिवस
८.	मोका तपासणी करणे	तालुका कृषि अधिकारी	१० दिवस
९.	लाभार्थी शेतकाऱ्याने अपलोड केलेली देयके, मोका तपासणी अहवाल, व इतर अनुषंगिक कागदपत्रे तपासणे व अनुदान शिफारस करणे.	लेखाधिकारी (उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय)	१० दिवस
१०.	अनुदान मंजुरी देणे.	उप विभागीय कृषि अधिकारी	१० दिवस
११.	अनुदान वितरण करणे.	प्रकल्प व्यवस्थापन कक्ष	

mahasarkariyojana.in

परिशिष्ट - २

हमीपत्र

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प - नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह)

मी श्री/श्रीमती ---------- राहणार ---------- तालुका ---------- जिल्हा- ---------- येथील रहिवाशी असून माझ्याकडे ८ अ/ Agristack/farmer ID नुसार एकुण ---------- हे. क्षेत्र आहे. त्यामाधील सर्व्हे नंबर/गट नंबर ---------- चे ७/१२ उताऱ्यानुसार एकुण ---------- हे. क्षेत्र असून त्यामध्ये मी नवीन सिंचन विहीर या घटकासाठी डीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करीत आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनामधील विहीत अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र मी सादर करीत आहे. यापूर्वी मी कोणत्याही शासकीय योजनेमधून नवीन सिंचन विहीर या घटकाकरीता अनुदान घेतलेले नाही अथवा यापुढे घेता येणार नाही याची मला जाणीव आहे.

१. नवीन सिंचन विहीर या घटकांतर्गत लाभार्थी निवडीसाठी राबविण्यात येणारी लॉटरी प्रक्रिया मला मान्य आहे. तसेच, सदर लॉटरी प्रक्रियेद्वारे माझी निवड झाली तरच मी या घटकाचा लाभ मिळण्यास पात्र राहील, याची मला पूर्ण जाणीव आहे.
२. नवीन सिंचन विहीर हा घटक राबविण्यासाठी प्रस्तावित केलेली शेतजमीन माझ्या मालकीची असून त्याचा ७/१२ उतारा माझ्या नावे आहे. संयुक्त ७/१२ मध्ये इतर खातेदारांकडून काही वाद निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी माझी राहील.
३. या घटकाकरिताच्या मार्गदर्शक सूचना व तांत्रिक निकषानुसार काम पूर्ण करणे मला बंधनकारक राहील. मार्गदर्शक सूचना, तांत्रिक निकष व अटी यासंदर्भात वेळोवळी केलेले बदल मला मान्य राहतील.
४. मला पूर्वसंमती प्राप्त झालेल्या सर्वे क्रमांक मध्ये सदर घटक राबविणे माझ्यावर बंधनकारक राहील.
५. पूर्वसंमती मिळाल्यापासून **एक वर्षात काम पूर्ण करणे** बंधनकारक असल्याची व एक वर्षात काम पूर्ण करून अनुदान मागणी न केल्यास पूर्व संमती रद्द होईल याची मला जाणीव आहे.
६. सदर काम पूर्ण करण्यासाठी मला कोणतीही आगाऊ रक्कम मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.
७. पूर्ण झालेल्या कामाच्या मोजमापानुसार तसेच एकूण पूर्वसंमती प्राप्त रकमेच्या विहीत मर्यादेतच अनुदान मिळेल, याची मला जाणीव असून याबाबत कोणतीही तक्रार असणार नाही. देय अनुदानाच्या व्यतिरिक्त येणारा खर्च मी स्वतः करीन.
८. सिंचन विहीरीचे अनुदान मिळण्यासाठीचे पात्रता निकष मला अवगत करुन देण्यात आलेले असून ते मला मान्य राहतील.
९. विहीरीची स्थळनिश्चिती करण्यासाठी भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणे मार्फत शेताचे सर्वेक्षण करून घेण्याची जबाबदारी माझी राहील याची मला जाणीव आहे.
१०. विहीर पुनर्भरण संरचनेचे काम तांत्रिक निकषांनुसार करणे माझ्यावर बंधनकारक राहील. पुनर्भरण संरचनेत गाळ किंवा दूषित पाणी जाणार नाही, यासाठी आवश्यक व्यवस्था मी स्वतः करीन.
११. नैसर्गिक आपत्तीमुळे विहिरीस किंवा पुनर्भरण संरचनेला हानी पोहोचल्यास प्रकल्पाकडून नुकसानभरपाई अनुज्ञेय राहणार नाही याची मला जाणीव आहे.
१२. काम पूर्ण झाल्यावर, मी काम पूर्णत्वाचा दाखला तालुका कृषि अधिकारी यांचेकडे ऑनलाइन सादर करीन.
१३. पूर्ण झालेल्या विहिरीची ७/१२ वर नोंद घेण्याची जबादारी माझी असून त्या शिवाय अंतिम टप्प्यातील अनुदान मिळणार नाही याची मला जाणीव आहे.
१४. काम पूर्ण झाल्यावर योजनेचा ४x३ फूट आकाराचा बोर्ड लावणे मला बंधनकारक राहील.
१५. विहीरीतून उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यासाठी मी सूक्ष्मसिंचन पद्धतीचा वापर करीन.

mahasarkariyojana.in

१६. प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना सदर घटकाची तपासणी करण्यासाठी माझी संमती राहील तसेच तपासणी साठी अडथळा करणार नाही.

१७. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत नवीन सिंचन विहीर या घटकाचा लाभ मिळणेसाठी मी सादर केलेली सर्व कागदपत्रे खरी आहेत. वरील सर्व माहीती सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणीत करुन देत आहे. मी चुकीची माहिती सादर करून अनुदान मिळवल्याचे आढळून आल्यास मी अनुदानास अपात्र ठरेल व मिळालेले अनुदान वसूल केले जाईल याची मला जाणीव आहे.

दिनांक : / / २०

ठिकाण :

अर्जदाराची सही / अंगठा

श्री/श्रीमती ----------

mahasarkariyojana.in

परिशिष्ट -३

स्थळ पाहणी अहवाल

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प - नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह)

श्री/श्रीमती ---------- मौजे ---------- ता.---------- जि.---------- यांनी त्यांचे मालकीचे स.नं. / गट नं. ---------- मधील क्षेत्रावर नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह) या घटकासाठी अर्ज केलेला आहे. मी दिनांक ----------रोजी प्रत्यक्ष भेट देऊन सदर प्रस्तावित प्रकल्प स्थळाची लाभार्थी समक्ष पाहणी केली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ क्र.	बाब	तपशील
१.	सदर अर्ज ग्राम कृषि विकास समितीने (GKVS) बैठकीमध्ये मंजूर केल्याचा दिनांक	
२.	लाभार्थीने मागणी केलेला घटक	
३.	लाभार्थ्याच्या ८-अ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.)	
४.	लाभार्थ्यांचे एकूण जमिनीचे क्षेत्र ०.४० हेक्टर पेक्षा जास्त आहे काय?	आहे/नाही
५.	नवीन विहीर (पुनर्भरणासह) साठी प्रस्तावित स्थळाचा सर्वे नं./गट नं.	
६.	GSDA चे पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र क्र. व दिनांक	
७.	प्रस्तावित नवीन विहीर (पुनर्भरणासह) व पिण्याच्या पाण्याचा सार्वत्रिक स्रोत यातील अंतर किमान ५०० मीटर पेक्षा जास्त आहे काय?	आहे/नाही
८.	लाभार्थीने दाखविलेली जागा तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय?	आहे/नाही
९.	लाभार्थ्याने यापूर्वी याच घटकाचा लाभ इतर शासकीय योजनेतून घेतलेला आहे काय ?	आहे/नाही
१०.	स्थळ तपासणीबाबतचे अभिप्राय -	

प्रस्तावित प्रकल्प स्थळाची मी लाभार्थी समक्ष पाहणी केली असता सदर घटकासाठी आवश्यक तांत्रिक निकषानुसार योग्य असून आवश्यक क्षेत्र लाभार्थ्याकडे उपलब्ध आहे. प्रकल्प राबविण्यासाठी लाभार्थी सक्षम व पात्र आहे. वरील सर्व बाबी विचारात घेऊन सदर लाभार्थ्यास पूर्वसंमती देणेस शिफारस करणेत येत आहे.

स्वाक्षरी

नाव :_____

सहायक कृषि अधिकारी

सजा :_____

ता. :_____

जि. :_____

टिप : सदरचे परिशिष्ट प्रकल्पाच्या DBT ॲपवर उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे सदरील परिशिष्ट अपलोड करण्यात येवू नये.)

mahasarkariyojana.in

परिशिष्ट - ४ (अ)
शेतक-याचा काम पूर्णत्वाचा अहवाल
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प - नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह)

प्रति,
मा. तालुका कृषि अधिकारी

मी श्री / श्रीमती ---------- गांव ---------- तालुका - ---------- जिल्हा.---------- असे प्रमाणित करतो / करते की, उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या पूर्व संमतीपत्र क्र ---------- दिनांक / /२० अन्वये मला मंजूर केलेले नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह) या कामामधील विहीरीचे खोदकाम मार्गदर्शक सूचनांमधील विहित तांत्रिक निकष व मंजूर अंदाजपत्रकानुसार दिनांक ---------- अखेर पूर्ण केले आहे.

कृपया, पूर्ण झालेल्या कामाचे मोजमाप घेऊन त्याची नियमानुसार मापनपुस्तीकेत नोंद घेऊन त्यानुसार देय अनुदानाची शिफारस करण्यांत यावी. सदर अनुदान माझ्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात यावे, ही विनंती.

दिनांक :----------
ठिकाण :----------

अर्जदाराची सही / अंगठा
श्री/श्रीमती ----------

mahasarkariyojana.in

परिशिष्ट - ४ (ब)

शेतक-याचा काम पूर्णत्वाचा अहवाल

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प - नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह)

प्रति,

तालुका कृषि अधिकारी

मी श्री / श्रीमती ---------- गांव ---------- तालुका - ---------- जिल्हा. ---------- असे प्रमाणित करतो / करते की, उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या पूर्व संमतीपत्र क्र ---------- दिनांक / /२० अन्वये मला मंजूर केलेले नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह) या कामाचे बांधकाम व विहीर पुनर्भरणाची कामे मार्गदर्शक सूचनांमधील विहित तांत्रिक निकषांनुसार पूर्ण केली असून, सदर काम दिनांक ---------- अखेर १०० टक्के पूर्ण झाले आहे.

कृपया, पूर्ण झालेल्या कामाचे मोजमाप घेऊन त्याची नियमानुसार मापनपुस्तीकेत नोंद घेऊन त्यानुसार देय अनुदानाची शिफारस करणे करण्यांत यावी. सदर अनुदान माझ्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात यावे, ही विनंती.

दिनांक :----------
ठिकाण :----------

अर्जदाराची सही / अंगठा
श्री/श्रीमती ----------

mahasarkariyojana.in

परिशिष्ट -५ (अ)

मोका तपासणी अहवाल

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प - नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह)

(प्रथम टप्पा) नवीन सिंचन विहीर या घटकाचे खोदकाम पूर्ण झाल्यानंतर)

अ.क्र.	बाब	तपशील
१)	तपासणी दिनांक :	
२)	लाभार्थ्याचे नाव :	
३)	गावाचे नाव :	
४)	तालुका :	
५)	जिल्हा :	
६)	पूर्वसंमती क्र . दिनांक	
७)	मंजूर असलेल्या प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट न.	
८)	पूर्वसंमती प्राप्त सर्व्हे नंबर मध्ये काम करण्यात आले आहे का?	होय/नाही
९)	विहीर खोदकामाचा तपशील	१. विहीर व्यास :- ---------- २. विहीर खोली :----------
१०)	पूर्वसंमती नुसार मंजूर अनुदान रक्कम	१. विहीर:- २. विहीर पुनर्भरण:-
११)	विहिरीची अंदाजपत्रकीय रक्कम रु.	१. विहीर:- २. विहीर पुनर्भरण:-
१२)	तांत्रिक निकषानुसार काम पूर्ण झाले आहे काय?	होय/नाही
१३)	मापनपुस्तिका नुसार देय अनुदान	
१४)	प्रथम टप्प्यात अधिकतम देय अनुदान (विहीर या घटकासाठी मंजूर अनुदानाच्या ६०% पेक्षा जास्त नसावे.)	
१५)	प्रथम टप्यासाठी शिफारशीत अनुदानाची रक्कम (अ.क्र. १३ व १४ मधील नमूद रकमापैकी कमी असणाऱ्या रकमेची शिफारस करावी.)	

मंजूर विहीर ही तांत्रिक निकषानुसार खोदण्यात आलेली आहे. या घटकांतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार असून इतर बाबीतही मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला असल्याने लाभार्थ्यास प्रथम टप्यासाठी अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

(लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी / अंगठा)

तालुका कृषि अधिकारी
दिनांक सहित

mahasarkariyojana.in

परिशिष्ट -५ (ब)

मोका तपासणी अहवाल

(अंतिम टप्पा) बांधकाम व पुनर्भरण काम पूर्ण झाल्यानंतर ,नवीन सिंचन विहीर या घटकाचे खोदकाम)

अ.क्र.	बाब	तपशील
१)	तपासणी दिनांक :	
२)	लाभार्थ्याचे नाव :	
३)	गावाचे नाव :	
४)	तालुका :	
५)	जिल्हा :	
६)	मंजूर असलेल्या प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट न.	
७)	जमिनीच्या पातळीपासून वर बांधलेल्या बांधकामाची उंची (मी) (Height Of Parapet)	---------- मी.
८)	जमिनीपासून खाली बांधकामाची खोली (मी)	---------- मी.
९)	बांधकाम सुस्थितीत आहे का?	होय / नाही
१०)	विहीर बांधकामाचा व्यास (मी)	---------- मी.
११)	विहीर या घटकासाठी एकूण मंजूर रक्कम	
१२)	प्रथम टप्प्याकरिता मापनपुस्तिकेनुसार येणारी रक्कम	
१३)	प्रथम टप्प्यात देण्यात आलेले अनुदान	
१४)	प्रथम टप्प्यातील शिल्लक अनुदान (अ.क्र.१२-१३)	
१५)	उर्वरित देय अनुदान (११-१३)	
१६)	दुसऱ्या टप्प्यातील विहीर बांधकामाचे मापन पुस्तिकेनुसार येणारी देय रक्कम	
१७)	अनु.क्र. १६ व १४ यांची एकूण रक्कम (अ.क्र. १६+१४)	
१८)	दुसऱ्या टप्प्याकरीता शिफारस करावयाची रक्कम (अ) (अनु. क्र. १७ व १५ पैकी कमी असलेली रक्कम)	
१९)	लाभार्थ्याने मार्गदर्शक सुचनेप्रमाणे विहीर पुनर्भरणाचे काम पूर्ण केले आहे का?	होय / नाही
२०)	विहीर पुनर्भरणासाठी मंजूर अनुदान रक्कम	
२१)	विहीर पुनर्भरणासाठी मापनपुस्तीकेनुसार येणारी रक्कम	
२२)	विहीर पुनर्भरणाची शिफारसीत करावयाची अनुदानाची रक्कम	
२३)	दुसऱ्या टप्प्यात एकूण देय रक्कम (अ.क्र. १६+ २२)	
२४)	अनुदानाची अंतिम रक्कम (प्रथम टप्पा + द्वितीय टप्पा) (अ.क्र. १३+ २३)	
२५)	सदर लाभार्थ्याने विहीरीची नोंद ७/१२ उताऱ्यावर घेतली आहे का?	होय / नाही

मंजूर सिंचन विहिरीचे खोदकाम व बांधकाम (विहीर पुनर्भरणसहित) विहित तांत्रिक निकषांनुसार करण्यात आलेले असून, सदर घटकाच्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदींचे तसेच इतर आवश्यक निकषांचे पालन करण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्यक्ष पूर्ण झालेल्या कामाच्या अंतिम टप्प्यानुसार लाभार्थ्यास अनुदान अदा करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

(लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी / अंगठा)

तालुका कृषि अधिकारी
दिनांक सहित

mahasarkariyojana.in

परिशिष्ट -६

पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

१.	तपासणी दिनांक	
२.	तपासणी अधिकारी	श्री/श्रीमती ----------
३.	पदनाम	
४.	तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/कर्मचारी	१. श्री/श्रीमती ---------- पदनाम ---------- २. श्री/श्रीमती ---------- पदनाम ----------
५.	लाभार्थ्याचे नाव	सर्वे नं./गट न. ---------- वर्गवारी: ---------- (अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर) मु.पो. ---------- ता. ---------- उपविभाग ---------- जि. ----------
६.	बाब	नवीन सिंचन विहीर (पुनर्भरणासह)
७.	अंदाजपत्रकीय रक्कम रु,	
९.	प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील	१. प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. ---------- २. विहिरीचा व्यास, मी. ---------- ३.विहिरीची खोली ,मी.---------- ४.जमिनीच्या पातळीपासून वर बांधलेल्या बांधकामाची उंची, (मी) (Height of Parapet). ---------- ५. जमिनीपासून खाली बांधकामाची खोली (मी) .----------
१०.	लाभार्थ्याने मार्गदर्शक सुचनेप्रमाणे विहीर पुनर्भरणाचे काम पूर्ण केले आहे का?	होय / नाही

११.	लाभार्थ्यास शिफारशीत करण्यात आलेले अनुदान	
१२.	तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ?	होय/नाही
१३.	नसल्यास तफावत रक्कम रु.	
१४.	मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ?	होय/नाही
१५.	लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय	
१६.	गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय	

तपासणी अधिकारी, श्री
पदनाम.
(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी
(नाव _____)